**फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ९/२०२१ मधील निशाणी क्र. ५ वरील आदेश**
**(सुप्रिया वि. अजय व इतर)**
**(CNR-MHSN08-000078-2021)**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार हिने घरगुती हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ याचे कलम २३ अन्वये जाबदार क्र. १ याचेकडून दरम्यानची पोटगी मिळण्याबाबत दाखल केला आहे.

**अर्जदाराची प्रस्तुत अर्जातील कथने संक्षिप्ततेत खालीलप्रमाणे:–**

२) अर्जदार हिने मूळ अर्ज घरगुती हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ चे तरतुदींअंतर्गत दाखल केलेला आहे. मूळ अर्जाचा गुणदोषावर न्यायनिवाडा होण्यास साहजिकच दिनावधी लागणार आहे. दरम्यान अर्जदार ही सध्या वाळेखिंडी येथे जाबदार यांचे शेतातील जनावराचे शेडमध्ये वास्तव्यास असून तिचे सोबतीला तिचे वडील आहेत. अर्जदाराचे पोटापाण्याची, दवापाण्याची व कपडेलत्याची सर्व व्यवस्था अर्जदाराचे वडीलच करत आहेत. अर्जदार हिला सध्या उदरनिर्वाहाकरिता कोणतेही साधन नाही. जाबदार हे अर्जदारास जाबदार क्र. १ चे नावाचे शेतही कसून खाऊ देईनात व जाबदार क्र. १ हा अर्जदाराचे पोटापाण्याची, दवापाणी व कपडालत्याची काहीएक व्यवस्था करत नाही म्हणून अर्जदार हिला प्रस्तुत अर्ज न्यायालयात दाखल करणे भाग पडले आहे.

३) अर्जदाराचे पुढील कथन असे की, जाबदार यांचे हैद्राबाद येथे दोन सराफ दुकान असून त्यांना सदर दुकानातून दरमहा साधारण १० लाख रुपयांचे उत्पन्न येते. शिवाय हैद्राबाद येथे त्यांचे दोन अपार्टमेंट बंगले असून ते भाड्याने दिलेले आहेत. त्याचे दरमहा ६० हजार रुपये भाडे येते. तसेच वाळेखिंडी येथे ६ खोल्यांचा

त्यांचा प्रशस्त बंगला असून वाळेखिंडी गावी ३० एकर बागायती क्षेत्र आहे. त्यामध्ये ते केळी, डाळींब व ऊस अशी नगदी पिके घेतात. त्यापासून त्यांना दरसाल ५० ते ६० लाख रुपयांचे उत्पन्न येते. शिवाय जाबदारांची गावी १२ ते १३ दुभती जनावरे असून त्यांचे दुधापासून त्यांना दरमहा ४० ते ५० हजार रुपयाचे उत्पन्न येते. जाबदार यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत उत्तम प्रकारची आहे. अर्जदार हिला पोटगी देण्याची जाबदार यांची आर्थिक ऐपत आहे.

४) अर्जदाराचे पुढील कथन असे की, अर्जदार हिला जनावरांचे शेडमध्ये ठेवून तिची काहीच व्यवस्था जाबदार यांनी केलेली नाही. उलट अर्जदार हिनेच माहेरहून पैसे आणावेत म्हणून त्रास देत आहेत. अर्जदार हिने वाळेखिंडी गाव सोडून माहेरी जावे म्हणूनही जाबदार तिला नाहक त्रास देत आहे. म्हणून अर्जदार हिला प्रस्तुतचा अर्ज करणे भाग पडले आहे. सबब, जाबदार क्र. १ कडून अर्जदार हिला अंतरिम पोटगीपोटी दरमहा रक्कम रुपये ३,०००/– देण्याबाबत आदेश व्हावा अशी विनंती अर्जदारातर्फे करण्यात आले आहे.

**<u>जाबदार क्र. १ याची सत्यवस्तुस्थिती दाखल म्हणून केलेली प्रतिकथने संक्षिप्ततेत खालीलप्रमाणेः–</u>**

५) जाबदार क्र. १ याने प्रस्तुत अर्जास त्याचे म्हणणे निशाणी क्र. २५ कडे दाखल केले आहे. त्यामध्ये त्याची प्रतिकथने अशी की, जाबदार क्र. २ व ६ हे सख्खे भाऊ आहेत. त्यांचे दरम्यान वडिलार्जित मिळकतीचे फार पूर्वीच वाटप झाले असून ते दोघेही त्यांच्या कुटुंबासह विभक्त राहण्यास आहेत. जाबदार क्र. २ व ३

यांची वाळेखिंडी येथे शेतजमीन, बंगला, जनावरे व गोठा आहे. तथापि, सदरची स्थावर व जंगम मालमत्ता ही जाबदार क्र. २ व ३ यांनी स्वतःचे उत्पन्नातून निर्माण केलेली मिळकत आहे. त्याच्याशी अर्जदार व जाबदार क्र. १ यांचा काडीमात्र संबंध नव्हता व नाही.

६) प्रस्तुत जाबदाराचे पुढील प्रतिकथन असे की, अर्जदार हिचे लग्नानंतर ती जाबदार क्र. १ बरोबर सिकंदराबाद येथे नांदण्यास गेली व तिने जाबदार क्र. १ बरोबर सन २०१५ पर्यंत संसार केला व त्यांना दोन मुले झाली. लग्नानंतर जाबदार क्र. १ ते ३ यांनी अर्जदार हिला व्यवस्थित सांभाळण्याचा प्रयत्न केला. जाबदार क्र. २ व ३ यांनी घरातील कामासाठी मोलकरीण लावली होती. त्यामुळे अर्जदार हिला घरातील कोणत्याही कामाचा ताण नव्हता. परंतु अर्जदार ही भांडकुदळ व हेकेखोर स्वभावाची महिला असल्याने तिने जाबदार क्र. २ व ३ यांनी उभे केलेल्या व्यवसायावर व संपत्तीवर डोळा ठेऊन जाबदार क्र. १ ते ३ यांना त्रास देणे सुरू केले. त्यातून ती जाबदार क्र. १ ते ३ यांना मनस्ताप देऊ लागली. ती जाबदार क्र. १ यास वडिलांचे कडून संपत्तीतील निम्मा हिस्सा घेऊन वेगळे राहू या आणि आई वडीलांना नशिबाच्या भरोशावर सोडून देऊ या अशी भाषा वापरू लागली. प्रस्तुत जाबदाराने अर्जदाराचे मागणीस भीक घातली नाही. त्यामुळे चिडून जाऊन अर्जदार ही जाबदाराची अवहेलना करू लागली. जाबदारांनी वारंवार अर्जदार हिला आर्जवे व विनंत्या करून देखील ती तिच्या सासू सासऱ्यांबाबत सौजन्य दाखवत नव्हती. तसेच त्यांच्या वडिलधाऱ्यापणाचा मान ठेवत नव्हती. म्हणून जाबदारांनी तिची समजूत घालण्याचा बराच प्रयत्न केला. परंतु तिने जाबदारांना तिला एकत्र कुटुंबात राहण्याचे नाही, कोणत्याही परिस्थितीत वेगळेच राहू या असा हट्ट धरू लागली. तसेच तिने

प्रस्तुत जाबदारास तिच्या मागणीकडे दुर्लक्ष केल्यास त्याचे आयुष्य देखील त्रासदायक करण्याची भाषा वापरली.

७) प्रस्तुत जाबदाराचे पुढील प्रतिकथन असे की, अर्जदार ही किरकोळ कारणावरून जाबदाराशी भांडण उकरून काढत होती आणि त्याला घाणेरड्या भाषेत शिवीगाळ करून जीव देण्याची धमकी देत होती. त्यामुळे जाबदारास बराच मानसिक त्रास होत होता. म्हणून जाबदाराने अर्जदाराच्या वागणुकीबद्दल तिच्या आई वडीलांना कळविले असता त्यांनी त्याकडे दुर्लक्ष करून जाबदारालाच वडिलांचे संपत्तीत निम्मा हिस्सा घेऊन अर्जदाराचे मर्जीप्रमाणे वेगळा संसार थाटा असा सल्ला दिला. अर्जदाराने दिलेल्या मानसिक त्रासाकडे जाबदार दुर्लक्ष करून आज ना उद्या अर्जदाराचे स्वभावात फरक पडेल या आशेवर अर्जदारासोबत संसाराचा गाडा हाकत असे.

८) प्रस्तुत जाबदाराचे पुढील प्रतिकथन असे की, त्याची मुलगी निधी ही ७ महिन्याची असताना अर्जदाराने वेगळे राहण्याच्या मागणीसाठी तिची मुलगी निधिला अंथरूणावर फेकून दिले होते. तसेच त्यांचा मुलगा राजवीर याचे जन्मानंतर अर्जदार ही सासरी सिकंदराबाद येथे काही दिवसच व माहेरी जास्त अशी राहू लागली. अर्जदार ही तिच्या आईवडिलांची एकुलती एक मुलगी असल्याने आईवडिलांच्या लाडात वाढलेली आहे. त्यामुळे तिला जाबदार क्र. १ ते ३ विषयी व अज्ञान मुलांविषयी कधीही प्रेम जिव्हाळा वाटला नाही. अगर तिने तो निर्माण करण्याचा प्रयत्न केला नाही.

९) प्रस्तुत जाबदाराचे पुढील प्रतिकथन असे की, अर्जदार हिने जाबदार क्र. २ व ३ यांचे संपत्तीच्या हव्यासापोटी तिचा मुलगा राजवीरच्या जन्मानंतर जाबदार क्र. २ व ३ यांना शारिरीक व मानसिक त्रास देणे व तिच्या नवऱ्याशी शिवीगाळ करून नेहमीच भांडणतंटा करणे, घरातील कामे नीट न करणे व तिच्या मुलांना व्यवस्थित न सांभाळणे असे प्रकार सुरू केले. त्यामुळे जाबदार क्र. १ याच्याशी तिचे वारंवार खटके उडू लागले. त्याचा त्रास जाबदार क्र. २ व ३ यांना होऊ लागला. म्हणून जाबदार क्र. २ व ३ यांनी जाबदार क्र. १ व अर्जदार हिला स्वतःपासून दूर करून स्वतंत्र व्यवसाय देखील मेटपल्ली, जि. करीमनगर, तेलंगणा येथे डिसेंबर २०१५ मध्ये निर्माण करून दिला. त्यामुळे हा जाबदार क्र. १ हा अर्जदार हिला घेऊन मेटपल्ली येथे राहण्यास गेला. अर्जदार हिने तिची मुलगी निधिचे सिकंदराबाद येथील शाळेत रक्कम रू. ६०,०००/– भरून घेतलेला प्रवेश रद्द केला त्यामुळे जाबदाराला रक्कम रू. ६०,०००/– वर पाणी सोडावे लागले व पुन्हा भरमसाठ प्रवेश फी भरून मेटपल्ली येथील विझडम हायस्कूल येथे तिच्या मुलीचा प्रवेश घेतला. तसेच त्याने भाड्याने मेटपल्ली येथे घर घेतले. घरकामासाठी अर्जदाराने मोलकरीण लावण्यासाठी जाबदार क्र. १ यास सक्ती केली. त्यामुळे जाबदार क्र. १ याने दोन्ही वेळच्या घरकामासाठी मोलकरीण लावली. तरी देखील अर्जदार ही आपल्या दोन्ही मुलांच्याकडे दुर्लक्ष करीत होती. त्यामुळे मुलांच्या आंघोळीचे अगर नाष्टा–पाण्याची तसेच त्यांना शाळेत पाठविण्याची संपूर्ण जबाबदारी प्रस्तुत जाबदार क्र. १ वरच होती. तसेच घरातील कामे आवरून जाबदार क्र. १ हा फिरती करून चांदीच्या दागिन्यांचा व्यवसाय करू लागला. अर्जदाराचे आईवडील देखील वारंवार मेटपल्ली येथे येऊन राहू लागले. अर्जदार ही त्यांच्या पाहुणाचारापोटी बराच खर्च करत होती. त्या खर्चामुळे जाबदाराचा व्यवसाय देखील तोट्यात गेला. तिच्या वारेमाप उधळपट्टीमुळे

व तिचे चैनीखोर स्वभावामुळे जाबदाराचे भांडवल संपुष्टात आले व त्यास व्यापारात नुकसान झाले. सुमारे दोन ते अडीच वर्षे अर्जदार व जाबदार क्र. १ मेटपल्ली येथे राहत होते. त्या दरम्यान ती जाबदार क्र. १ याला वैवाहिक सुखांपासून वंचित ठेऊ लागली. लाजेखातर जाबदार क्र. १ याने सदरची बाब तिच्या आईवडिलांपासून लपवून ठेवली. तसेच व्यापारात नुकसान झाल्यामुळे नाईलाजामुळे जाबदार क्र. १ हा जानेवारी २०१८ मध्ये पुन्हा त्याच्या वडिलांच्या छत्रछायेखाली राहण्यासाठी सिकंदराबाद येथे आला व त्याच्या वडिलांचे दुकानात मदत करू लागला. त्यावेळी देखील अर्जदार ही जाबदार क्र. १ ते ३ याचेसोबत राहत असताना घरातील कामे न करणे, भांडणतंटा उकरून काढणे व मुलांचेकडे दुर्लक्ष करणे असे प्रकार करीत होती. ती एक महिनाभर तेथे राहिली.

१०) प्रस्तुत जाबदाराचे पुढील प्रतिकथन असे की, अर्जदाराचे भावाचे लग्न दि. ०५/०२/२०१८ रोजी असल्याचे कारणावरून ती माहेरी निघून गेली. ती जून २०१८ पर्यंत तेथेच राहिली. एप्रिल २०१८ मध्ये तिची सासू म्हणजे जाबदार क्र. ३ हिचा घरकामे करीत असताना अपघात होऊन पाय फ्रॅक्चर झाला. तरीदेखील अर्जदार तिला विनंती करूनही सासरी नांदण्यास आली नाही. याउलट अर्जदाराने जाबदारांचे बाबतीत जनमाणासामध्ये त्यांची बदनामी करण्यास सुरू केली. अर्जदार हिला नांदविण्यासाठी जाबदारांनी बराच प्रयत्न केला. समाजातील वडिलधाऱ्या व्यक्तींमार्फत तिला नांदविण्यासाठी घालवाड येथे मे २०१८ मध्ये मिटींग घेतली. त्यावेळी अर्जदाराने सर्व वडिलधाऱ्यांसमक्ष तिच्या चुका कबूल करून जून २०१८ मध्ये सिकंदराबाद येथे नांदण्यास आली. परंतु तिने येताना तिचे दागिने आणले नाहीत. या कालावधीत अर्जदार व जाबदार क्र. १ यांच्यामध्ये नेहमी भांडणे होऊ

लागली व त्यांच्याकडून अज्ञान मुलांकडे दुर्लक्ष होऊ लागले. ऑगष्ट २०१८ मध्ये अर्जदार ही जाबदार क्र. १ याचेशी भांडण करून त्याचा व मुलांचा त्याग करून माहेरी राहण्यास गेली. तेथे ती एप्रिल २०१९ पर्यंत राहिली अर्जदार व जाबदाराचा संसार सुरळीत व्हावा यासाठी समाजातील वरिष्ठ मंडळींनी नेज गावी मिटींग घेतली. त्यावेळी दोघांनाही व्यवस्थित संसार करण्याबाबत हमीपत्र लिहून देण्यास सांगितले असता अर्जदार व तिची आई यांनी जाबदार क्र. २ चे मिळकतीतील निम्मा हिस्सा वाटून अर्जदाराला दिल्याशिवाय ती नांदण्यास येणार नाही असे म्हणून मिटींग सोडून निघून गेल्या.

११) प्रस्तुत जाबदाराचे पुढील प्रतिकथन असे की, अर्जदार ही भांडकुदळ व हेकेखोर स्वभावाची असल्याने ती वाटपावर ठाम असल्याने जाबदार क्र. २ याने त्यांचे वडिलार्जित मिळकतीत सन २००३ मध्ये झाले वाटपाप्रमाणे प्रत्येकाचा हिस्सा पृथ्थक करून दिला. अर्जदार व जाबदार क्र. १ यांना तात्पुरते राहाण्यासाठी स्वतःच्या दोन खोल्या व जनावरांचा गोठा देऊन व ५ म्हैशी, ५ जर्शी गाई व ४१ देशी गाय देऊन त्याचे दुधाचे व्यवसायापासून उदरनिर्वाह करा असे सांगितले. त्याप्रमाणे ते तेथे राहत असताना तिने जाबदार क्र. १ साठी स्वयंपाकही केला नाही अगर त्यास कोणत्याही प्रकारे शेतात व जनावरे राखण्यासाठी काहीही मदत केली नाही. याउलट ती जाबदार क्र. १ ला रागाच्या भरात अंगावर धाऊन येऊन मारहाण करत होती. तसेच ती जाबदार क्र. ४ व ५ यांनाही गावातील लोकांसमोर शिवीगाळ व धमकी देत होती. त्या दोन खोल्यात राहत असताना अर्जदार ही जाबदार क. १ यास शरीरसुखापासून वंचित करीत होती. त्यास गोठ्यात अगर अंगणात झोपण्यास भाग पाडत हाती. अर्जदाराच्या अशा वागण्यामुळे जाबदार क्र. १ यास अर्जदारास मानसिक

उपचाराची गरज आहे असे जाणवल्याने त्याने तिला सप्टेंबर २०१९ च्या शेवटच्या आठवड्यात मानसोपचार तज्ञाकडे येण्याबाबत विनवले असता ती अचानक भडकली व तिने जाबदाराशी भांडणतंटा करून तिच्या आई वडीलांना तातडीने बोलावून घेतले. त्यांनीही दि. २६/०९/२०१९ रोजी अर्जदाराला त्यांच्यासोबत तिच्या माहेरी नेले. जाबदाराने त्याच्या व मुलांच्या भवितव्याचा विचार करून तिला नांदण्यासाठी आणणेचा बराच प्रयत्न केला. जाबदार क्र. १ रमेश चव्हाण व त्याची पत्नी यांचेसह अर्जदाराचे माहेरी जाऊन तिला नांदण्यास येण्याची विनंती केली. परंतु तिचे आईवडील व मामा यांनी अर्जदारास नांदविण्यास पाठविण्याचे साफ नाकारले. तसेच अर्जदाराने व तिच्या आईने जाबदारास व रमेश चव्हाण यांना पाणीसुद्धा विचारले नाही. तसेच त्या सर्वांनी जाबदारास वडिलांचे मिळकतीतील निम्या हिश्याची मागणी पूर्ण केल्याशिवाय ती नांदायला येणार नाही असे सांगून हिस्सा मिळेपावेतो बदनामी करण्याची व वेगवेगळ्या कोर्ट केसेस पोलीस केसेस करण्याची धमकी दिली. त्यामुळे नाईलाजाने जाबदार क्र. १ हा परत आला.

१२) प्रस्तुत जाबदाराचे पुढील प्रतिकथन असे की, त्यानंतर जाबदार क्र. १ हा त्याच्या दोन्ही मुलांसह सिकंदराबाद येथे राहत असताना अर्जदार हिने जाबदारास खोट्या मजकुराची नोटीस पाठविली. त्या नोटीसीस जाबदाराने दि. ३१/०८/२०२० रोजी वस्तुस्थिती दर्शक उत्तर दिले आहे. तसेच अर्जदाराने जाबदाराचा व मुलांचा त्याग केल्यामुळे जाबदाराने तिचेविरूद्ध कौटुंबिक न्यायालय सिकंदराबाद येथे घटस्फोटासाठी अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे चिडून जाऊन अर्जदार हिने तिचे आईवडिलांचे व मामाचे ऐकून जाबदाराच्या शेतात व इतर जाबदार क्र. २ व ३ यांच्या स्वकष्टार्जित घरात घुसण्याचा व शिवीगाळ धमकी देण्याचा प्रयत्न

सुरू केला. तसेच त्यांना शेतातील पीक काढण्यास हरकत व अडथळा करण्याचा प्रयत्न सुरू केला. तसेच जाबदारांना त्रास देण्याच्या हेतूने व आर्थिक फायदा करून घेण्याचे दुष्ट हेतूने अर्जदार हिने दि. २०/०८/२०२० चे नोटीसीची रचना करून त्याआधारे प्रस्तुत अर्ज, रे.दि.मु. क्र. ९९/२०२१ जिल्हा न्यायालयातील कि.दि.अर्ज क्र. १०६/२०२१ व पोलीस केस इत्यादी प्रकरणांची उभारणी केली आहे.

१३) प्रस्तुत जाबदाराचे पुढील प्रतिकथन असे की, जाबदार क्र. १ यास कोणतेही उत्पन्नाचे स्वतंत्र साधन नाही. जाबदार क्र. १ हा सिकंदराबाद येथे त्याच्या वडिलांचे दुकानात त्यांना मदत करीत असतो. त्यामुळे जाबदार क्र. १ व त्याची दोन्ही मुले जाबदार क्र. २ याचे उत्पन्नातून उदरनिर्वाह करत आहे. त्याच्या हिश्याची शेती करणेदेखील त्याला अडचणीचे झाले आहे. त्यामुळे त्याची अर्जदार हिला उचलून पोटगी देण्याची ऐपत नाही. तिचे शिक्षण जाबदार क्र. १ पेक्षा जास्त झाले आहे. जाबदार क्र. १ ने अर्जदार हिच्याबरोबर संसार सुखाचा व्हावा यासाठी बरेच प्रयत्न केले. परंतु, अर्जदाराचे हेकेखोर स्वभावामुळे ते प्रयत्न निष्फळ ठरले. अर्जदार ही त्याची आईवडिलांच्या व जाबदारांच्या भाऊबंदातील विरोधी व्यक्तींच्या सांगण्यावरून जाबदारांना विविध प्रकारे त्रास देत आहे. त्यामुळे अर्जदार ही पोटगी अथवा नुकसान भरपाई, संरक्षण आदेश व अन्य दादी मिळविण्यास पात्र नाही. त्यामुळे तिचा प्रस्तुतचा अंतरिम पोटगीचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा.

१४) अर्जदारातर्फे विद्वान विधिज्ञ श्री. डी. टी. मल्लाड आणि जाबदार क्र. १ तर्फे विद्वान विधिज्ञ श्री. पी. ए. नाईक यांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुतचा अर्ज, मूळ

अर्ज आणि जाबदार क्र. १ चे म्हणणे विचारात घेतले. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

१५) अर्जदारतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. डी. टी. मल्लाड यांनी असा युक्तिवाद केला की, जाबदार क्र. १ याने अर्जदाराशी असलेले नातेसंबंध मान्य केले आहेत. अर्जदार व जाबदारांनी परस्परविरोधी आरोप व प्रत्यारोप केले आहेत. त्यांचे वैधावैधतेबाबत व सत्यासत्यतेबाबत संपरिक्षेदरम्यान निर्णय होणार आहे. तथापि अर्जदार ही जाबदार क्र. १ याची पत्नी या नात्याने दरम्यानचे काळात त्याचेकडून अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे. अर्जदार ही प्रस्तुत अर्जास कारण घडल्याचा दि. १०.०९.२०२० पासून जनावराचे गोठ्यामध्ये रहात आहे. जाबदार क्र. १ हा सिकंदराबाद येथे रहात आहे. त्यास सराफ दुकानाचे उत्पन्नातून ठोस आर्थिक उत्पन्नाचे साधन आहे. अर्जदार व जाबदारांचे दरम्यान विविध वाद प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यांचा खर्च करणे अर्जदारास कठीण जाऊ लागले आहे. त्याचबरोबर तिला स्वतःचा उदरनिर्वाह करणे अडचणीचे होऊ लागले आहे. जाबदार क्र. १ ने उत्पन्नाचे साधन असल्याचे मान्य केले आहे. अर्जदाराने जाबदारांचे मालकीचे मिळकतींची महसूल अभिलेखातील कागदपत्रे हजर केली आहेत. त्यावरून जाबदार हे सदर मिळकतींमधून नगदी पिके घेत असल्याचे स्पष्ट होते. अर्जदाराने मागणी केलेल्या अंतरिम पोटगीची रक्कम अत्यंत वाजवी आहे. ती अवास्तव मागणी नाही. जाबदारांनी देखील त्यास ठोस हरकत दर्शविलेली नाही. सबब अर्जदाराने विनंती केल्याप्रमाणे तिला अंतरिम पोटगी मंजूर होऊन मिळणे जरुरीचे आहे.

१६) याउलट जाबदार क्र. १ तर्फे विद्वान विधिज्ञ श्री. पी. ए. नाईक यांनी असा युक्तिवाद केला की, अर्जदार व जाबदार यांचेत विविध प्रकरणे प्रलंबित आहेत.

अर्जदाराने जाबदार क्र. १ च्या उत्पन्नाचे स्त्रोताबाबत कोणतीही कथने केलेली नाहीत. अर्जदाराने उत्पन्नाचे म्हणून जे काही स्त्रोत नमूद केले आहेत ते सर्व जाबदार क्र. २ व ३ यांचे स्वकष्टार्जित मिळकतींचे आहेत. जाबदार क्र. १ यास उत्पन्नाचे स्वतंत्र साधन असल्याचे सकृतदर्शनी दाखविणारा कोणताही पुरावा अर्जदाराने सादर केलेला नाही. जाबदारांचे दरम्यान वाटप झाले आहे. जाबदार क्र. १ हा केवळ जाबदार क्र. २ यांना त्यांचे सराफ दुकानामध्ये मदत करतो. त्यापासून त्याला केवळ रक्कम रू. ८,०००/– एवढेच वेतन मिळते. जाबदार क्र. २ व ३ हेच अर्जदार व जाबदार क्र. १ यांचे दोन मुलांचे पालनपोषण व सांभाळ करीत आहेत. जाबदार क्र. १ याचेवर कर्ज परतफेड करण्याची जबाबदारी आहे. त्यामुळे कर्जाचे हप्त्याची रक्कम वजा केली असता जाबदार क्र. १ याचेकडे शिल्लक राहणारी रक्कम अत्यंत तोकडी आहे. जाबदार क्र. १ यास शेतीमधून कोणतेही उत्पन्न मिळत नाही. अर्जदार केवळ जाबदारांना नाहक त्रास देत आहे. जाबदार क्र. १ याचा अर्जदार हिने स्वतःहून कोणत्याही सबळ कारणाशिवाय त्याग केला आहे. त्याशिवाय ती स्वतः सुदृढ आहे. त्यामुळे तिला कोणत्याही अंतरिम पोटगीची आवश्यकता नाही. जाबदार क्र. १ यास स्वतःचे उत्पन्नाचे पुरसे साधन नसल्यामुळे त्याची अर्जदारास अंतरिम पोटगी देण्याची ऐपत नाही. त्यामुळे अर्जदाराची विनंती फेटाळण्यास पात्र आहे असे प्रतिपादन त्यांनी केले.

१७) अर्जदाराने तिचे कथनांची सकृतदर्शनी पुष्टी करण्यासाठी यादी निशाणी क्र. ३ सोबत दाखल केलेल्या तिचे व जाबदार क्र. १ हिचे विवाहाची यादी, विवाहाची निमंत्रण पत्रिका, विवाह नोंदणीचे प्रमाणपत्र, तिचे दोन्ही मुलांचे जन्माचे नोंदीचे दाखले, तिने तंटामुक्ती समिती अध्यक्ष, वाळेखिंडी यांचेकडे दाखल केलेला अर्ज,

जाबदार क्र. १ हिला दि. २०/०८/२०२० रोजी पाठविलेल्या कायदेशीर नोटीसची प्रत, जाबदार क्र. १ याने दि. ३१/०८/२०२२ रोजी पाठविलेल्या उत्तरी नोटीसची प्रत, अर्जदाराने पोलीस निरीक्षक, जत पोलीस ठाणे यांचेकडे दि. ०५.११.२०२० रोजी दाखल केलेल्या तक्रार अर्जांच्या प्रती, वाळेखिंडी येथील गट क्र. ११०१, ११०४, ११०५, १२६२ व जत येथील गट क्र. ५०/२ च्या सातबारा उताऱ्यांच्या प्रती अशा कागदोपत्री पुराव्यांवर भिस्त ठेवली आहे.

१८) याउलट जाबदार क्र. १ तर्फे ३२ सोबत त्याने टी. व्ही. एस. क्रेडिट यांचेकडून घेतलेल्या कर्जाचा खाते उतारा या कागदपत्रावर भिस्त ठेवली आहे.

१९) वर नमूद केल्याप्रमाणे अर्जदार व जाबदार क्र. १ यांची परस्परविरोधी कथने, सादर केलेला युक्तिवाद व दाखल केलेली कागदपत्रे यांचा विचार करून सर्वप्रथम ही बाब येथे नमूद करणे जरुरीचे आहे की, जाबदारांनी अर्जदारावर कौटुंबिक हिंसाचार केला आहे वा ती स्वतःहून सबळ कारणाशिवाय जाबदारांचा त्याग करून वेगळी रहाते या बाबी मूळ अर्जाचे चौकशीचे कामी उभय पक्षकारांना ज्याचे त्याचे कथनाचे शाबितीसाठी पुरावा व प्रतिपुरावा सादर करण्याची संधी दिल्यानंतरच परिणामकारकरीत्या गुणदोषावर निर्धारता येणार आहेत. प्रस्तुत अर्जाचे निर्णयाकरीता अर्जदार ही तिने विनंती केल्याप्रमाणे अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र असल्याचे तिने दर्शवून दिले आहे किंवा कसे एवढाच मर्यादित प्रश्न विचारात घेणे जरुरीचे आहे. सदर प्रश्नाचे निर्णयाकरीता उभय पक्षकारांनी या टप्प्यापर्यंत सादर केलेली परस्परविरोधी कथने आणि सादर केलेली कागदपत्रे यांचा विचार करणे जरुरीचे आहे.

२०) त्याअनुषंगाने ही बाब देखील नमूद करणे जरुरीचे आहे की, अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज हा मूळ अर्जाचे कामी जाबदारांनी सोन्याच्या दागिन्यांचा मोबदला म्हणून माहेरहून रक्कम रू. १,५०,०००/– घेऊन येण्यासाठी, तसेच घरातील कामे करण्याचे कारणावरून तिला वारंवार अपमानित करून, शिवीगाळ करून, मारहाण करून , घरातील सर्व कामे करावयास लावून, जनावरांची कामे करावयास लावून, अर्जदार रहात असलेल्या गोठ्यामधून तिने निघून जावे म्हणून तिला मारहाण करून तिच्या संसारोपयोगी साहित्याचे नुकसान करून तसेच इतर अनेक प्रकारे अर्जदार हिला शारिरीक, आर्थिक व मानसिक स्वरूपाचा कौटुंबिक हिंसाचार केल्यामुळे तिला असहायपणे जाबदार क्र. १ पासून वेगळे राहून जनावरांचे गोठ्यात रहावे लागत असल्याचे कथन करून मूळ अर्ज दाखल केला आहे.

२१) याउलट जाबदार क्र. १ याने अर्जदार ही हट्टी व हेकेखोर स्वभावाची होती, तिने घरातील कोणतीही कामे न करता जाबदार क्र. २ व ३ यांचा अपमान करणे, जाबदार क्र. १ याला जाबदार क्र. २ व ३ यांचेकडून संपत्तीचा निम्मा हिस्सा विभक्त करून वेगळे राहण्यासाठी जबरदस्ती करणे, त्यास त्याने सहमती दर्शविली नाही म्हणून वारंवार त्याचा अपमान करणे, त्यास अपशब्द वापरणे, त्याला संसार सुखांपासून वंचित ठेवणे, मुलांकडे व्यवस्थित लक्ष न देणे, निष्कारण भांडण तंटा करून कोणतेही सबळ कारण नसताना सारखे माहेरी जाऊन रहाणे व इतर अनेक प्रकारे मानसिक त्रास देऊन त्याचे जगणे मुश्कील केल्याची प्रतिकथने करून अर्जदाराचे अर्जास आव्हान दिले आहे.

२२) सदरच्या परस्परविरोधी कथनांचा प्रकरणाचे या टप्प्यावर विचार केला असता ही बाब नमूद करणे महत्त्वाचे आहे की, अर्जदार ही जाबदारांपासून त्यांनी

केलेल्या कौटुंबिक हिंसाचारामुळे वेगळी रहात आहे वा कोणतेही सबळ कारण नसताना स्वतःहून वेगळी रहात आहे ही बाब या टप्प्यावर निर्धारित करता येणार नाही. अर्जदार व जाबदार क्र. १ यांचे त्याबाबत परस्परांविरोधात अत्यंत गंभीर आरोप आहेत. सदरच्या कथनांच्या गुणदोषावर निर्णयाकरीता सविस्तर चौकशी करणे जरुरीचे आहे. तथापि ही बाब नमूद करणे जरुरीचे आहे की, जाबदार क्र. १ ने अर्जदाराशी असलेले विवाहाचे नाते नाकारलेले नाही. त्याचबरोबर ही देखील अविवादीत बाब आहे की, अर्जदार ही सध्या जाबदार क्र. १ पासून विभक्तपणे वाळेखिंडी येथे रहात आहे. सदरच्या बाबींचा कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायद्यामध्ये नमूद केलेल्या व्यथित व्यक्ती, कौटुंबिक हिंसाचार, कौटुंबिक नातेसंबंध आणि जाबदार या संज्ञांच्या व्याख्यांचे पार्श्वभूमीवर विचार केला असता जाबदार क्र. १ हा अर्जदार हिचा पती या नात्याने तिला अंतरिम पोटगी देण्यास कायदेशीर व नैतिकदृष्ट्या जबाबदार आहे.

२३) अर्जदार ही जाबदार क्र. १ याचेपासून सध्या विभक्त रहात असल्याची बाब देखील वादग्रस्त नाही. दरम्यानच्या काळात जाबदार क्र. १ याने तिच्या उदरनिर्वाहासाठी काही व्यवस्था केली असल्याचे सकृतदर्शनी विचारात घेता येईल अशा कोणत्याही बाबी जाबदार क्र. १ याने अभिलेखावर या टप्प्यापर्यंत सादर केलेल्या नाहीत. जाबदार क्र. १ याचे अर्जदार ही सुदृढ असल्यामुळे स्वतःकरीता उत्पन्न कमावू शकते हे कथन विचारात घेतले असता ही बाब नमूद करणे जरुरीचे आहे की, अर्जदार तशा प्रकारे उत्पन्न सध्या कमावित असून तिला कोणत्याही अंतरिम पोटगीची आवश्यकता नसल्याची बाब सकृतदर्शनी दाखवून देण्यासाठी कोणताही पुरावा जाबदार क्र. १ याने सादर केलेला नाही. त्याचबरोबर सदरची बाब

अधिक परिणामकारकपणे प्रस्तुत मूळ अर्जाचे चौकशीअंती निर्धारित करता येणारी आहे. वादाकरीता जरी अर्जदार ही स्वतःकरीता उत्पन्न कमावण्याची क्षमता असलेली महिला असल्याचे जरी गृहीत धरले तरी, जाबदार क्र. १ याची अर्जदार हिच्या उदरनिर्वाहाची सोय करण्याची तिचा पती या नात्याने असणारे कायदेशीर जबाबदारीपासून त्यास दूर जाता येईल असा त्याचा अर्थ काढता येणार नाही. त्यामुळे जाबदार क्र. १ ची त्याअनुषंगाने असलेली कथने या टप्प्यावर विचारात घेता येण्यासारखी नाहीत असे माझे मत आहे. त्यामुळे जाबदार क्र. १ हा अर्जदार हिचा पती या नात्याने तिच्या किमान उदरनिर्वाहाकरीता आवश्यक असणारे रकमेसाठी प्रस्तुत मूळ अर्जाचे गुणदोषावर निर्णय होईपावेतो अंतरिम पोटगी देण्यासाठी कायदेशीरदृष्ट्या व नैतिकदृष्ट्या जबाबदार आहे असे माझे मत आहे.

२४) त्याचबरोबर अर्जदार व जाबदार क्र. १ यांनी परस्परांविरोधी केलेल्या आरोप आणि प्रत्यारोपांचे स्वरूप व गांभीर्य विचारात घेतले असता त्यांचेतील संबंध हे मोठ्या प्रमाणावर ताणले गेले असल्याचे दिसून येते. जाबदार क्र. १ याने दरम्यानचे कालावधीत अर्जदार हिचे उदरनिर्वाहाची सोय करण्यासाठी काय प्रयत्न व व्यवस्था केली आहे याबाबत कोणताही खुलासा केलेला नाही. सदर बाबींचा विचार केला असता अर्जदारास अंतरिम पोटगी मागणी करणेची जरूर निर्माण झाली आहे या अर्जदाराच्या कथनामध्ये मला तथ्य आढळून येते.

२५) आता अर्जदार ही जाबदार क्र. १ कडून किती रकमेची अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे व जाबदार क्र. १ याची तिला अंतरिम पोटगी देण्याची ऐपत आहे काय या बाबीचा विचार केला असता अर्जदाराने जाबदार क्र. १ यास तिला अंतरिम

पोटगी देण्यासाठी उत्पन्नाचा स्त्रोत असल्याचे सकृतदर्शनी दाखवून दिले आहे काय हे पाहणे जरुरीचे आहे. अर्जदाराने त्याबाबत जाबदारांची दोन सराफी दुकाने, वाळेखिंडी येथील शेतजमिनी आणि दुभती जनावरे यांचेपासून मोठ्या प्रमाणावर उत्पन्नाचे साधन असून जाबदार क्र. १ याची तिला अंतरिम पोटगी देण्याची ऐपत असल्याची सविस्तर कथने वर नमूद केल्याप्रमाणे केली आहेत. याउलट जाबदार क्र. १ याने सराफा दुकाने, शेतजमिनी आणि दुभती जनावरे ही जाबदार क्र. २ व ३ यांची स्वकष्टार्जित मालमत्ता आहे व जाबदार क्र. २ व ३ यांनी त्यास काढून दिलेल्या स्वतंत्र व्यवसायात अर्जदाराचे उधळपट्टीमुळे नुकसान झाले असल्यामुळे तो सध्या जाबदार क्र. २ यांचे सराफा दुकानात नोकरी करीत असल्याचे प्रतिकथन केले आहे. तसेच जाबदार क्र. १ चे विधिज्ञांनी त्यास केवळ त्याचे नोकरीतून दरमहा केवळ रक्कम रू. ८,०००/– एवढेच वेतन मिळत असल्याचे व त्याने काढलेल्या कर्जाचा हप्ता भरून त्याला अत्यंत तुटपुंजी रक्कम शिल्लक रहात असल्यामुळे तो अंतरिम पोटगी देण्यास सक्षम नसल्याचे प्रतिपादन केले आहे.

२६) सदर बाबींच्या दृष्टीने विचार केला असता अर्जदाराने अभिलेखावर दाखल केलेल्या शेतजमिनींच्या सातबारा उताऱ्यांचे अवलोकन केले असता जाबदार क्र. १ याचेही नांवाने गट क्र. ११०४ व गट क्र. ११०५ च्या मिळकतींमध्ये अनुक्रमे हे. १=५५ आर आणि हे ०=८० आर एवढे क्षेत्र नोंद असल्याचे दिसते. अर्जदार व जाबदार क्र. १ यांचे परस्परविरोधी कथनांवरून त्यांचे दरम्यान सदर मिळकतींचे अनुषंगाने न्यायालयात वाद प्रलंबित असल्याचे देखील दिसून येते. तथापि जाबदार क्र. १ चे नांवाने असणाऱ्या शेतजमिनीच्या स्त्रोतापासून त्यास अजिबातच उत्पन्न मिळत नाही हे जाबदार क्र. १ चे कथन सकृतदर्शनी स्वीकारार्ह वाटत नाही.

त्याचबरोबर जाबदार क्र. १ प्रस्तुत अर्जास सादर केलेल्या म्हणण्यातील कथनांचा विचार केला असता त्यामध्ये त्याने तो जाबदार क्र. २ यांचे दुकानात त्यांना मदत करीत असल्याचे नमूद केले आहे. मात्र जाबदार क्र. १ चे विधिज्ञांनी युक्तिवादादरम्यान मात्र तो जाबदार क्र. २ यांचे दुकानात कामास असून त्यास केवळ दरमहा रक्कम रू. ८,०००/– एवढेच वेतन मिळत असल्याचे प्रतिपादन केले आहे. या पार्श्वभूमीवर प्रकरणातील तथ्यांचा विचार केला असता जाबदार क्र. १ व अर्जदार हे एकत्र रहात असलेल्या कालावधीत जाबदार क्र. २ व ३ यांचेसोबतच सिकंदराबाद येथे सुरूवातीस रहात होते त्यानंतर जाबदार क्र. १ यास करीमनगर येथे स्वतंत्र दुकान सुरू करून दिले होते असे जाबदारांचे कथन आहे. त्यानंतर त्यास नुकसान झाले म्हणून तो पुन्हा जाबदार क्र. २ व ३ यांचे छत्रछायेखाली येऊन राहू लागला व त्यांना दुकानात पुन्हा मदत करू लागला असेही त्यांचे कथन आहे.

२७) या कथनांचा विचार केला असता जाबदार क्र. १ त्याचे आईवडीलांचेच म्हणजे जाबदार क्र. २ व ३ यांचे दुकानातच केवळ वेतनाने काम करीत असावा ही बाब तारतम्यबुद्धीस पटण्यासारखी नाही. तथापि वादाकरीता जरी तसे गृहीत धरले तरीदेखील अर्जदाराने मागणी केलेल्या अंतरिम पोटगीच्या रकमेचा विचार केला असता जाबदार क्र. १ यास त्याचे सदरचे वेतनातून व शेतीच्या मिळणाऱ्या उत्पन्नातून तिला अंतरिम पोटगी देण्याची त्याची ऐपत असल्याचेच निर्धारावे लागेल अशी परिस्थिती या प्रकरणात असल्याचे माझे मत आहे.

२८) जाबदार क्र. १ याने त्यास कर्जाचे हप्ते भरावे लागत असल्याचे दाखवून देण्यासाठी जो कर्ज खातेऊतारा हजर केला आहे त्याचे अवलोकन केले असता

सदरचे कर्ज जाबदार क्र. १ याने अलीकडेच काढले असल्याचे दिसून येते. जरी जाबदार क्र. १ याचेवर कर्जाचे हप्ते फेडण्याची जबाबदारी असली तरी त्यामुळे तो अर्जदारास द्याव्या लागणाऱ्या अंतरिम पोटगीच्या कायदेशीर जबाबदारीतून स्वतःची सुटका करून घेऊ शकणार नाही. मा. सर्वोच्च न्यायालयाने व मा. उच्च न्यायालयांनी विविध न्यायनिवाड्यांद्वारे वारंवार असे कायदेशीर तत्त्व प्रतिपादन केले आहे की, अजिबातच उत्पन्नाचे साधन नसणाऱ्या परंतु उत्पन्न कमावण्याची शारिरीक क्षमता असणाऱ्या पुरुषाने आपल्या पत्नी व मुलांचे उदरनिर्वाहासाठी शारिरीक श्रम करून जरूर तर मजुरीने उत्पन्न कमावून त्यांच्या किमान उदरनिर्वाहाची सोय करणे जरुरीचे आहे. जाबदार क्र. १ याचे शारिरीक वयाचा विचार केला असतादेखील तो निश्चितपणे शारिरीक श्रम करून उत्पन्न कमावण्याच्या क्षमतेचा आहे. त्यामुळे त्याच्या कथनाप्रमाणे त्यास केवळ तुटपुंजे वेतन मिळते ही बाब जरी विचारात घेतली तरी देखील त्याच्यावर पत्नीच्या उदरनिर्वाहासाठी व्यवस्था करण्यासाठी अधिक श्रम करून तशी व्यवस्था करण्याची कायदेशीर जबाबदारी आहे. त्यामुळे जाबदार क्र. १ चे वतीने करण्यात आलेल्या सदर प्रतिकथनांमध्ये मला या टप्प्यावर ठोस आधार दिसून येत नाही.

२९) सदर बाबींचा विचार केला असता जाबदार क्र. १ याची कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायद्याचे कलम २३ चे तरतुदीअन्वये अर्जदार हिला अंतरिम पोटगी देण्याची कायदेशीर जबाबदारी आहे असे माझे मत आहे. अर्जदार हिला अंतरिम पोटगी म्हणून किती रक्कम जाबदार क्र. १ ने देण्याचे आदेशीत करावे या बाबीचा विचार केला असता अर्जदार हिने तिला रक्कम रू. ३,०००/– एवढी रक्कम दरमहा अंतरिम पोटगी म्हणून मिळावी अशी विनंती केली

आहे. तथापि ही बाब नमूद करणे जरुरीचे आहे की, अर्जदार ही एकटीच जाबदार क्र. १ याचे पासून विभक्त रहात आहे. अर्जदार व जाबदार क्र. १ यांची मुले ही जाबदारांकडे रहात असून जाबदार क्र. १ चे कथनाप्रमाणे त्यांचे शिक्षणाची व पालनपोषणाची जबाबदारी जाबदार क्र. २ व ३ हे पहात आहेत. अर्जदार व जाबदार क्र. १ यांचेदरम्यान मुलाचे ताब्याबाबतचा वाद देखील प्रलंबित आहे. तथापि, ही बाब नमूद करणे जरुरीचे आहे की, सद्यस्थितीत मुले ही अर्जदारजवळ रहात नाहीत. त्यामुळे अर्जदाराचे एकटीच्या उदरनिर्वाहाचा विचार केला असता, तसेच प्रकरणातील परस्परविरोधी तथ्यांचा, केलेल्या आरोप व प्रत्यारोपाचे स्वरूपाचा, अर्जदार व जाबदार क्र. १ यांचे राहणीमानाचा व सध्याचे स्थितीचा विचार केला असता अर्जदारास जाबदार क्र. १ याचेकडून अंतरिम पोटगीपोटी दरमहा रक्कम रू. २,५००/– देण्याचे आदेशीत केल्यास या प्रकरणात न्यायोचित समतोल साधला जाईल असे माझे मत आहे. प्रस्तुत प्रकरणात प्रस्तुतचा अर्ज दाखल केल्यापासून जाबदार क्र. १ ने कोणतीही पोटगीची व्यवस्था केली नसल्याचे दिसून आले असल्यामुळे सदरची अंतरिम पोटगीची रक्कम अर्जदारास प्रस्तुतचा अर्ज दाखल केल्याच्या दिनांकापासून मंजूर करणे देखील न्यायाचे व गरजेचे आहे असे माझे मत आहे. या सर्व बाबींचा विचार केला असता अर्जदार हिचा प्रस्तुतचा अर्ज अंशतः मंजूर होणेस पात्र आहे असे माझे मत आहे. सबब मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

१. अर्जदाराचा प्रस्तुतचा अर्ज अंशतः मंजूर करणेत येतो.

२. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायद्याचे कलम २३ अन्वये जाबदार क्र. १ याने अर्जदारास प्रस्तुत अंतरिम

पोटगीचा अर्ज दाखल केल्याच्या दिनांकापासून म्हणजे दि. ०७/०१/२०२१ पासून दरमहा रक्कम रू. २,५००/– (अक्षरी रुपये दोन हजार पाचशे फक्त) अंतरिम पोटगी म्हणून प्रस्तुत अर्जाचे अंतिम निकालापावेतो अदा करावेत असे आदेशीत करण्यात येते.

३. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायद्याचे कलम २२ अन्वये प्रस्तुत आदेशाच्या प्रती अर्जदार व जाबदार क्र. १ यांना विनामूल्य देण्यात याव्यात.

स्वाक्षरीत/–
(एकनाथ को. चौगले)
(JO Code -MHSN2400)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, जत

स्थळ:– जत
दि. ०७/१०/२०२२

**प्रमाणपत्र**

मी असे प्रमाणित करतो की, या पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर व मूळ आदेशामधील मजकूर हा एकसारखा आहे.

| | |
|---|---|
| स्टेनोग्राफरचे नांव | श्री. एस. ए. जमादार<br>(लघुलेखक श्रेणी–III) |
| कोर्टाचे नांव | श्री. एकनाथ को. चौगले.<br>दिवाणी न्यायाधीश क.स्तर व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, जत. |
| दिनांक | ०७/१०/२०२२. |
| पीठासीन अधिकारी यांनी सही केलेली तारीख | २१/१०/२०२२. |
| आदेश अपलोड केलेली तारीख | १३/१२/२०२२. |